# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** मनपा शिक्षण विभाग (माध्यमिक) अंतर्गत माध्यमिक व कनिष्ठ
**{शिक्षण विभाग}** महाविद्यालयाकरिता सत्र २०२३-२४ मधील ६८ शिक्षकांना सत्र २०२४-२५ या सत्रात पुन्हा नियुक्ती देणे व जाहिरातीद्वारे नवीन १८ शिक्षकांची माध्यम व विषयनिहाय मासिक मानधन रू. २५,०००/- मानधनावर मुलाखतीद्वारे तात्पुरती भरती करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाद्वारे माध्यमनिहाय मराठी - ०७, हिंदी – ११, उर्दु – ०९ व इंग्रजी – ०१ अशा एकुण २८ माध्यमिक शाळा तसेच ०४ कनिष्ठ महाविद्यालय (०३ उर्दु माध्यम (कला/विज्ञान/वाणिज्य) व ०१ इंग्रजी माध्यम (विज्ञान) संचालित करण्यात येतात. यापैकी १७ माध्यमिक शाळा व ०१ कनिष्ठ महाविद्यालय अनुदानित असुन त्यांना शालार्थ वेतन प्रणालीद्वारे शासनाकडून १००% वेतन अनुदान प्राप्त होते. उर्वरीत विना अनुदानित ११ शाळा व ३ कनिष्ठ महाविद्यालये यांचा खर्च मनपा वहन करीत असते. माध्यमिक शाळांमध्ये गणित, इंग्रजी, विज्ञान या विषयांचे शिक्षकांची कमतरता असल्याने व प्राथमिक आस्थापनेवर देखिल हे विषय शिकविण्यास संबधित शैक्षणिक पात्रतेचे शिक्षक उपलब्ध नसल्याने सर्वप्रथम शैक्षणिक सत्र २००९ मध्ये घडयाळी तासिका तत्वावर १० शिक्षकांना रितसर जाहिरात देवुन व संपूर्ण निवड प्रक्रियेचा अवलंब करून तात्पुरते नियुक्त करण्यात आले होते. उच्च माध्यमिक शाळांकरिता रू. ७०/- प्रति तासिका ४५ मिनीटे व माध्यमिक करिता रू. ४५/- प्रति तासिका ३५ मिनीटे प्रमाणे नियुक्ती देण्यात आली होती. (मा. आयुक्तांचे दि. २७.०४.२०१० च्या आदेशान्वये ठराव कार्यान्वित करण्यात आला.)

शैक्षणिक सत्र २०१८-१९ या शैक्षणिक सत्रामध्ये मराठी, हिंदी, उर्दु व इंग्रजी माध्यमांच्या शाळात विषयनिहाय शिक्षकांची कमतरता असल्याने इंग्रजी, गणित, विज्ञान, उर्दु या विषयांकरिता जाहिरात देवुन व संपूर्ण भरती प्रक्रिया राबवुन माध्यमिक करिता रू. १४,०००/- व उच्च माध्यमिक करिता रू. १५,०००/- मानधनावर एकुण ५४ शिक्षकांची १० महिन्यांच्या कालावधीकरिता नियुक्ती केली गेली.

शासन निर्णय क्र. एसआरव्ही२०१७/प्र.क्र.४५५/कार्या.१२, दि. ०९ फेब्रुवारी २०१८ नुसार कंत्राटी पद्धतीवर सदर नेमणुक ११ महिन्याच्या कालावधीकरिता जास्तीत जास्त तिन वेळा करता येईल असे नमुद आहे. त्यानुसार मा. आयुक्तांचे मान्यतेनुसार आधीच्या सत्र २०१८-१९ मधील ५४ कंत्राटी मानधन शिक्षकांना सत्र २०२२-२३ पर्यंत स्थायी समितीची अपेक्षित खर्चास मंजूरी प्राप्त करून नियुक्ती आदेश प्रत्येक वर्षी ११ महिन्यांचे कालावधीकरिता देण्यात आले होते.

सत्र २०२१-२२ सत्रात कोविडची परिस्थिती असल्याकारणाने जाहिरात काढून मुलाखती घेणे संयुक्तीक नसल्याने टिपणीत नमुद करून मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १०१/वि.क्र.५८, दि. २२.०६.२०२१ नुसार व मा. आयुक्त यांचे दि. ०८.०७.२०२१ च्या मान्यतेनुसार (T-९८) सत्र २०१८-१९ मधीलच ५४ कंत्राटी शिक्षकांना सत्र २०२१-२२ करिता मुदतवाढ देवुन पुन्हा ११ महीन्याच्या कालावधीकरिता नियुक्ती आदेश देण्यात आले.

सत्र २०२२-२३ मध्ये दि. ०९/०२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार व मा. सर्वोच्च न्यायालय यांचे दि. १२ जुलै २०१६ च्या निर्णयानुसार कंत्राटी शिक्षकांना ११ महीण्याच्या कालावधीकरिता जास्तीत जास्त तीन वेळा नियुक्ती देता येते असे नमुद आहे. परंतु शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही२०१७/प्र.क्र.४५५/ कार्या.१२, दि. ०७ मार्च २०१८ मध्ये नमुद असल्याप्रमाणे दि. १८ फेब्रु. २०१८ च्या शासन परिपत्रकातील सुचनांचे पुनर्विलोकन करण्यात येत असुन तोपर्यंत सदर शासन परिपत्रकातील **सुचनांना** स्थगीती देण्यात येत आहे असे नमुद आहे. यानुसार नव्याने जाहिरात देवुन पुन:श्च निवड प्रक्रिया न राबविता सत्र २०२१-२२ मधीलच ५४ कंत्राटी शिक्षकांना ११ महिन्यांच्या कालावधीकरिता मा. प्रशासक यांच्या मंजुरीने सन २०२२-२३ मध्ये पुन:नियुक्ती देण्यात आली. या कंत्राटी शिक्षकांना सत्र २०१८-१९ पासुन १० किंवा ११ महिन्यांच्या कालावधीकरिता नव्याने भरती प्रक्रिया न राबविता ५ वेळा नियुक्ती दिल्या गेली.

तसेच सत्र २०२२-२३ मध्ये मा. आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका, नागपूर यांचे दि. १७/०८/२०२२ च्या मान्यतेने सर्व ५४ कंत्राटी शिक्षकांचे मानधन माध्य. रू. १४०००/- व उच्च माध्य. रू. १५०००/- वरून सरसकट माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे रू. २५०००/- मानधन करण्यात

आले व त्यांना एका शैक्षणिक सत्रात १२ किरकोळ रजा व वैद्यकीय कारणास्तव १० रजा अनुज्ञेय करण्यात आल्या.

सत्र २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता उपरोक्त कालावधीत नियत वयोमानाने सेवानिवृत्त, स्वेच्छा निवृत्ती व मृत्यू इ. कारणाने माध्यमिक व उच्च माध्यमिक करिता विषयनिहाय व माध्यमनिहाय शिक्षकांची निकड लक्षात घेता सत्र २०२३-२४ करिता एकुण ८३ शिक्षकांची आवश्यकता होती. वरील शासन परिपत्रकानुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांचे दि. १२ जुलै २०१६ च्या निर्णयानुसार कंत्राटी शिक्षकांची ३ वर्षानंतर भरती प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे, यास मा. आयुक्तांनी दि. २५/०५/२०२३ रोजी मान्यता प्रदान केलेली असुन हा आर्थिक तसेच धोरणात्मक स्वरूपाचा निर्णय असल्यामुळे यास मा. प्रशासक यांची दि. २८/०६/२०२३ ला मान्यता प्राप्त आहे.

सत्र २०२४-२५ मधील माहे जुन २०२४ पर्यंतच्याच सेवानिवृत्त, स्वेच्छा निवृत्ती व मृत्यू इत्यादी स्थितीस अनुसरून कंत्राटी शिक्षकांच्या आवश्यकतेचा प्रस्ताव सादर करण्याचे मा. शिक्षणाधिकारी यांचे निर्देश प्राप्त आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत कार्यरत कंत्राटी शिक्षकांपैकी माध्यमनिहाय व विषयनिहाय माध्यमिक करिता ६७ व उच्च माध्यमिक शाळेकरिता १९ असे एकुण ८६ कंत्राटी शिक्षकांची आवश्यकता आहे. **परंतु माहे जुलै २०२४ पासुन डिसेंबर २०२४ पर्यंत ८ मुख्याध्यापकांसह १२ सहा. शिक्षक असे एकुण २० शिक्षक सेवानिवृत्त होतील. त्यांचे जागेवर सुद्धा शिक्षक द्यावे लागतील. त्यामुळे कंत्राटी शिक्षक आवश्यकतेमध्ये आणखी वाढ होईल.** याबाबत दि. २७/०५/२०२४ ला सादर केलेल्या प्रस्तावात नमुद करण्यात आले आहे. शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये नियुक्त केलेल्या एकुण ७० कंत्राटी शिक्षकांपैकी २ कंत्राटी शिक्षकांनी राजीनामा दिल्याने सद्यस्थितीत ६८ कंत्राटी शिक्षक उपलब्ध आहेत. या कंत्राटी शिक्षकांना ११ महिन्याच्या कंत्राटावर रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर घेण्यात आले होते. त्याच ६८ कंत्राटी शिक्षकांना सत्र २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरीता पुन:श्च ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी तत्वाने रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर घेण्याचे मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा, नागपूर यांचे दि. १७/०६/२०२४ चे आदेश प्राप्त आहेत. तसेच जुन २०२४ पर्यंत च्या आवश्यकतेनुसार सत्र २०२४-२५ मध्ये उर्वरीत १८ कंत्राटी शिक्षकांची रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर घेण्याकरीता नव्याने संपूर्ण निवड प्रक्रिया राबवुन तात्पुरती ११ महिन्यांच्या कालावधीकरीता भरती करण्याबाबत याच आदेशात नमुद आहे.

सदर बाब आर्थिक तसेच धोरणात्मक स्वरूपाची असल्याने शैक्षणिक सत्र २०२३-२४ मधील उपलब्ध असलेल्या ६८ कंत्राटी शिक्षकांचे शैक्षणिक सत्र २०२४-२५ करीता ११ महिन्याच्या कालावधीकरीता पुन:श्च रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर घेण्याकरीता त्यांचे आदेश काढून निर्गमीत करणे तसेच रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर नव्याने घेण्यात येणाऱ्या १८ कंत्राटी शिक्षकांकरीता माध्यमनिहाय व विषयनिहाय जाहिरात प्रसिद्ध करण्याकरिता उक्त ठरावानुसार मान्यता प्रदान करणे, बिंदु नामावली नुसार कंत्राटी शिक्षकांचे रोस्टर मनपा मागासवर्ग कक्षामार्फत मावक विभागीय आयुक्त कार्यालयाकडून तपासणी करून घेण्यास मंजूरी देणे, मा. अति. आयुक्त (शहर) यांचे अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करणे, प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक व वेळ ठरविणे इत्यादी वरील सर्व बाबींसह ठरावास मंजूरी प्रदान करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा, नागपूर यांचेकडे मान्यतेस्तव ठरावाचे प्रारूप सादर करण्यात येत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 884/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 02/07/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मनपा शिक्षण विभाग (माध्यमिक) अंतर्गत माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाकरिता सत्र २०२३-२४ मधील ६८ शिक्षकांना सत्र २०२४-२५ या सत्रात पुन्हा नियुक्ती देणे व जाहिरातीद्वारे नवीन १८ शिक्षकांची माध्यम व विषयनिहाय मासिक मानधन रू. २५,०००/- मानधनावर मुलाखतीद्वारे तात्पुरती भरती करण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाद्वारे माध्यमनिहाय मराठी - ०७, हिंदी – ११, उर्दु – ०९ व इंग्रजी – ०१ अशा एकुण २८ माध्यमिक शाळा तसेच ०४ कनिष्ठ महाविद्यालय (०३ उर्दु माध्यम (कला/विज्ञान/वाणिज्य) व ०१ इंग्रजी माध्यम (विज्ञान) संचालित करण्यात येतात. यापैकी १७ माध्यमिक शाळा व ०१ कनिष्ठ महाविद्यालय अनुदानित असुन त्यांना शालार्थ वेतन प्रणालीद्वारे शासनाकडून १००% वेतन अनुदान प्राप्त होते. उर्वरीत विना अनुदानित ११ शाळा व ३ कनिष्ठ महाविद्यालये यांचा खर्च मनपा वहन करीत असते. माध्यमिक शाळांमध्ये गणित, इंग्रजी, विज्ञान या विषयांचे शिक्षकांची कमतरता असल्याने व प्राथमिक आस्थापनेवर देखिल हे विषय शिकविण्यास संबधित शैक्षणिक पात्रतेचे शिक्षक उपलब्ध नसल्याने सर्वप्रथम शैक्षणिक सत्र २००९ मध्ये घडयाळी तासिका तत्वावर १० शिक्षकांना रितसर जाहिरात देवुन व संपूर्ण निवड प्रक्रियेचा अवलंब करून तात्पुरते नियुक्त करण्यात आले होते. उच्च माध्यमिक शाळांकरिता रू. ७०/- प्रति तासिका ४५ मिनीटे व माध्यमिक करिता रू. ४५/- प्रति तासिका ३५ मिनीटे प्रमाणे नियुक्ती देण्यात आली होती. (मा. आयुक्तांचे दि. २७.०४.२०१० च्या आदेशान्वये ठराव कार्यान्वित करण्यात आला.)

शैक्षणिक सत्र २०१८-१९ या शैक्षणिक सत्रामध्ये मराठी, हिंदी, उर्दु व इंग्रजी माध्यमांच्या शाळात विषयनिहाय शिक्षकांची कमतरता असल्याने इंग्रजी, गणित, विज्ञान, उर्दु या विषयांकरिता जाहिरात देवुन व संपूर्ण भरती प्रक्रिया राबवुन माध्यमिक करिता रू. १४,०००/- व उच्च माध्यमिक करिता रू. १५,०००/- मानधनावर एकुण ५४ शिक्षकांची १० महिन्यांच्या कालावधीकरिता नियुक्ती केली गेली.

शासन निर्णय क्र. एसआरव्ही२०१७/प्र.क्र.४५५/कार्या.१२, दि. ०९ फेब्रुवारी २०१८ नुसार कंत्राटी पद्धतीवर सदर नेमणुक ११ महिन्याच्या कालावधीकरिता जास्तीत जास्त तिन वेळा करता येईल असे नमुद आहे. त्यानुसार मा. आयुक्तांचे मान्यतेनुसार आधीच्या सत्र २०१८-१९ मधील ५४ कंत्राटी मानधन शिक्षकांना सत्र २०२२-२३ पर्यंत स्थायी समितीची अपेक्षित खर्चास मंजूरी प्राप्त करून नियुक्ती आदेश प्रत्येक वर्षी ११ महिन्यांचे कालावधीकरिता देण्यात आले होते.

सत्र २०२१-२२ सत्रात कोविडची परिस्थिती असल्याकारणाने जाहिरात काढून मुलाखती घेणे संयुक्तीक नसल्याने टिपणीत नमुद करून मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १०१/वि.क्र.५८, दि. २२.०६.२०२१ नुसार व मा. आयुक्त यांचे दि. ०८.०७.२०२१ च्या मान्यतेनुसार (T-९८) सत्र २०१८-१९ मधीलच ५४ कंत्राटी शिक्षकांना सत्र २०२१-२२ करिता मुदतवाढ देवुन पुन्हा ११ महीन्याच्या कालावधीकरिता नियुक्ती आदेश देण्यात आले.

सत्र २०२२-२३ मध्ये दि. ०९/०२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार व मा. सर्वोच्च न्यायालय यांचे दि. १२ जुलै २०१६ च्या निर्णयानुसार कंत्राटी शिक्षकांना ११ महीण्याच्या कालावधीकरिता जास्तीत जास्त तीन वेळा नियुक्ती देता येते असे नमुद आहे. परंतु शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही२०१७/प्र.क्र.४५५/ कार्या.१२, दि. ०७ मार्च २०१८ मध्ये नमुद असल्याप्रमाणे दि. १८ फेब्रु. २०१८ च्या शासन परिपत्रकातील सुचनांचे पुर्नविलोकन करण्यात येत असुन तोपर्यंत सदर शासन परिपत्रकातील **सुचनांना** स्थगीती देण्यात येत आहे असे नमुद आहे. यानुसार नव्याने जाहिरात देवुन पुन:श्च निवड प्रक्रिया न राबविता सत्र २०२१-२२ मधीलच ५४ कंत्राटी शिक्षकांना ११ महिन्यांच्या कालावधीकरिता मा. प्रशासक यांच्या मंजुरीने सन २०२२-२३ मध्ये पुन:नियुक्ती देण्यात आली. या कंत्राटी शिक्षकांना सत्र २०१८-१९ पासुन १० किंवा ११ महिन्यांच्या कालावधीकरिता नव्याने भरती प्रक्रिया न राबविता ५ वेळा नियुक्ती दिल्या गेली.

तसेच सत्र २०२२-२३ मध्ये मा. आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका, नागपूर यांचे दि. १७/०८/२०२२ च्या मान्यतेने सर्व ५४ कंत्राटी शिक्षकांचे मानधन माध्य. रू. १४०००/- व उच्च माध्य. रू. १५०००/- वरून सरसकट माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे रू. २५०००/- मानधन करण्यात आले व त्यांना एका शैक्षणिक सत्रात १२ किरकोळ रजा व वैद्यकीय कारणास्तव १० रजा अनुज्ञेय करण्यात आल्या.

सत्र २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता उपरोक्त कालावधीत नियत वयोमानाने सेवानिवृत्त, स्वेच्छा निवृत्ती व मृत्यू इ. कारणाने माध्यमिक व उच्च माध्यमिक करिता विषयनिहाय व माध्यमनिहाय शिक्षकांची निकड लक्षात घेता सत्र २०२३-२४ करिता एकुण ८३ शिक्षकांची आवश्यकता होती. वरील शासन परिपत्रकानुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांचे दि. १२ जुलै २०१६ च्या निर्णयानुसार कंत्राटी शिक्षकांची ३ वर्षानंतर भरती प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे, यास मा. आयुक्तांनी दि. २५/०५/२०२३ रोजी मान्यता प्रदान केलेली असुन हा आर्थिक तसेच धोरणात्मक स्वरूपाचा निर्णय असल्यामुळे यास मा. प्रशासक यांची दि. २८/०६/२०२३ ला मान्यता प्राप्त आहे.

सत्र २०२४-२५ मधील माहे जुन २०२४ पर्यंतच्याच सेवानिवृत्त, स्वेच्छा निवृत्ती व मृत्यू इत्यादी स्थितीस अनुसरून कंत्राटी शिक्षकांच्या आवश्यकतेचा प्रस्ताव सादर करण्याचे मा. शिक्षणाधिकारी यांचे निर्देश प्राप्त आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत कार्यरत कंत्राटी शिक्षकांपैकी माध्यमनिहाय व विषयनिहाय माध्यमिक करिता ६७ व उच्च माध्यमिक शाळेकरिता १९ असे एकुण ८६ कंत्राटी शिक्षकांची आवश्यकता आहे. **परंतु माहे जुलै २०२४ पासुन डिसेंबर २०२४ पर्यंत ८ मुख्याध्यापकांसह १२ सहा. शिक्षक असे एकुण २० शिक्षक सेवानिवृत्त होतील. त्यांचे जागेवर सुद्धा शिक्षक द्यावे लागतील. त्यामुळे कंत्राटी शिक्षक आवश्यकतेमध्ये आणखी वाढ होईल.** याबाबत दि. २७/०५/२०२४ ला सादर केलेल्या प्रस्तावात नमुद करण्यात आले आहे. शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये नियुक्त केलेल्या एकुण ७० कंत्राटी शिक्षकांपैकी २ कंत्राटी शिक्षकांनी राजीनामा दिल्याने सद्यस्थितीत ६८ कंत्राटी शिक्षक उपलब्ध आहेत. या कंत्राटी शिक्षकांना ११ महिन्याच्या कंत्राटावर रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर घेण्यात आले होते. त्याच ६८ कंत्राटी शिक्षकांना सत्र २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरीता पुन:श्च ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी तत्वाने रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर घेण्याचे मा. आयुक्त तथा प्रशासक, मनपा, नागपूर यांचे दि. १७/०६/२०२४ चे आदेश प्राप्त आहेत. तसेच जुन २०२४ पर्यंत च्या आवश्यकतेनुसार सत्र २०२४-२५ मध्ये उर्वरीत १८ कंत्राटी शिक्षकांची रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर घेण्याकरीता नव्याने संपूर्ण निवड प्रक्रिया राबवुन तात्पुरती ११ महिन्यांच्या कालावधीकरीता भरती करण्याबाबत याच आदेशात नमुद आहे.

सदर बाब आर्थिक तसेच धोरणात्मक स्वरूपाची असल्याने शैक्षणिक सत्र २०२३-२४ मधील उपलब्ध असलेल्या ६८ कंत्राटी शिक्षकांचे शैक्षणिक सत्र २०२४-२५ करीता ११ महिन्याच्या कालावधीकरीता पुन:श्च रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर घेण्याकरीता त्यांचे आदेश काढून निर्गमीत करणे तसेच रू. २५,०००/- प्रतिमाह मानधनावर नव्याने घेण्यात येणाऱ्या १८ कंत्राटी शिक्षकांकरीता माध्यमनिहाय व विषयनिहाय जाहिरात प्रसिद्ध करण्याकरिता उक्त ठरावानुसार मान्यता प्रदान करणे, बिंदु नामावली नुसार कंत्राटी शिक्षकांचे रोस्टर मनपा मागासवर्ग कक्षामार्फत मावक विभागीय आयुक्त कार्यालयाकडून तपासणी करून घेण्यास मंजूरी देणे, मा. अति. आयुक्त (शहर) यांचे अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करणे, प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक व वेळ ठरविणे इत्यादी वरील सर्व बाबींसह ठरावास मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.